19

RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

(२५)

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - १२ ] गुरुवार ते बुधवार, मार्च २० - २६, २०२५ / फाल्गुन २९, शके १९४६ ते चैत्र ०५ शके १९४७ [ पृष्ठे-१३२

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**नगर विकास विभाग**

**चौथा मजला, मुख्य इमारत,**
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.**

दिनांक : ६ मार्च २०२५

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**अधिसूचना**

क्रमांक टीपीएस-१८२२/१६७५/प्र.क्र.१०७/२०२३/नवि-१३.— ज्याअर्थी, शासनाचे नगर विकास विभागाने लोणावळा नगरपरिषदेच्या (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नगरपरिषद" असा करण्यात आला आहे) भागश: क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३१ *(१)* अन्वये अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९६/७५१/प्र.क्र.८२-९६/नवि-१३, दिनांक २९ जून २००५ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९६/७५१/प्र.क्र.२८३/०६/नवि-१३, दिनांक १८ ऑगस्ट २००६ अन्वये मंजूर केली असून त्या अनुक्रमे दिनांक २७ ऑगस्ट २००५ व दिनांक १ नोव्हेंबर २००६ रोजीपासून अमलात आलेली आहे. (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेनुसार, मौजे वलवण येथील सि.स.नं. २८९/१ या जागेवर (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जागा" असा करण्यात आला आहे) आरक्षण क्रमांक ५७ ब, "विभागीय कार्यालय, कम्युनिटी हॉल व पार्किंग" दर्शविले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त आरक्षण" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, लोणावळा नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक १७१, दिनांक २५ जुलै २०२३ अन्वये, उक्त विकास योजनेमधील उक्त जागेवरील उक्त आरक्षण वगळून ती रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत फेरबदलाची कार्यवाही (यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेखिलेला) करण्याचे ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने उक्त अधिनियमाच्या कलम ३७ *(१)* अन्वये वैधानिक कार्यवाही करून उक्त प्रस्तावित फेरबदलाचा प्रस्ताव उक्त नियोजन प्राधिकरणाने दिनांक १४ डिसेंबर २०२३ चे पत्र क्रमांक ७८६ अन्वये शासनाचे मंजुरीसाठी सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, विषयांकित ठिकाणचे पार्किंगकरिताचे आरक्षण नियोजनदृष्ट्या आवश्यक असल्याची बाब विचारात घेता उक्त फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ *(२)* अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करून शासन याद्वारे उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

२७

## उपआयुक्त यांजकडून

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी

क्रमांक नासुके/०५/कावि-१७/२०२५.— नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी परिपत्रक क्रमांक न.प.प्र.सं./का-०८/ई-गव्हर्नस/यूडीटीडी/आर.टी.एस./२०२५/१६२, दिनांक ६ जानेवारी २०२५ अन्वये, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नागरिकांना सेवा-सुविधा देत असते; त्याअंतर्गत अधिसूचित केलेल्या सेवा सोबतच्या तक्त्यामध्ये संबंधित शासन निर्णय व अधिसूचित आदेशाद्वारे दर्शविण्यात आल्या आहेत.

### पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या ५७ सेवांची यादी

### परिशिष्ट

| अ.क्र. | लोकसेवा | संबंधित शासन निर्णय | अधिसूचित आदेश |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे. | शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४, दिनांक २३ जून २०१५ | आदेश क्र. नासुके/०१/कावि-२५९/२०१६, दि. ७ जुलै २०१६ अन्वये १५ सेवा अधिसूचित करणेत आलेल्या आहेत. |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे. | | |
| ३ | विवाह नोंदणी. | | |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे. | | |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे. | | |
| ६ | (अ) दस्तऐवजाच्या आधारे हस्तांतरण प्रमाणपत्र देणे. | | |
| | (आ) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | | |
| ७ | झोन दाखला देणे. | | |
| ८ | भाग नकाशा देणे. | | |
| ९ | बांधकाम परवानगी देणे. | | |
| १० | जोते प्रमाणपत्र देणे. | | |
| ११ | भोगवटा प्रमाणपत्र देणे. | | |
| १२ | नळजोडणी देणे. | | |
| १३ | जल निस्सारण जोडणी देणे. | | |
| १४ | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे. | | |
| १५ | अग्निशमन अंतिम ना-हरकत दाखला देणे. | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दिनांक ४ सप्टेंबर २०१७ व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दिनांक २६ ऑगस्ट २०१९. | आदेश क्र. नासुके/०१/कावि-३५२/२०१७, दि. २९ सप्टेंबर २०१७ अन्वये ३५ सेवा अधिसूचित करणेत आलेल्या आहेत. |
| १६ | नव्याने कर आकारणी. | | |
| १७ | पुन: कर आकारणी. | | |
| १८ | कराची मागणीपत्र तयार करणे. | | |
| १९ | करमाफी मिळणे. | | |
| २० | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे. | | |
| २१ | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे / इतर मार्गाने. | | |
| २२ | स्वयंमूल्यांकन. | | |
| २३ | आक्षेप नोंदविणे. | | |
| २४ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन. | | |
| २५ | मालमत्ता पाडणे व पुन:बांधणी कर आकारणी. | | |
| २६ | मालकी हक्कात बदल करणे. | | |
| २७ | नळजोडणी आकारामध्ये बदल करणे. | | |
| २८ | तात्पुरते / कायमस्वरूपी नळजोडणी खंडित करणे. | | |

परिशिष्ट--चालू

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| २९ | पुन: जोडणी करणे. | | |
| ३० | वापरामध्ये बदल करणे. | | |
| ३१ | पाणी देयक तयार करणे. | | |
| ३२ | प्लंबर परवाना. | | |
| ३३ | प्लंबर परवाना नूतनीकरण करणे. | | |
| ३४ | थकबाकी नसल्याचा दाखला. | | |
| ३५ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे. | | |
| ३६ | अनधिकृत नळजोडणी तक्रार करणे. | | |
| ३७ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार करणे. | | |
| ३८ | पाण्याची गुणवत्ता तक्रार करणे. | | |
| ३९ | व्यापार / व्यवसाय / साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र. | | |
| ४० | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र. | | |
| ४१ | नवीन परवाना मिळणे. | | |
| ४२ | परवान्याचे नूतनीकरण. | | |
| ४३ | परवाना हस्तांतरण. | | |
| ४४ | परवाना दुय्यम प्रत. | | |
| ४५ | व्यवसायाचे नाव बदलणे. | | |
| ४६ | व्यवसाय बदलणे. | | |
| ४७ | परवानाधारक / भागीदाराचे नाव बदलणे. | | |
| ४८ | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ / कमी). | | |
| ४९ | परवाना रद्द करणे. | | |
| ५० | कालबाह्य परवान्यासाठी नूतनीकरण सूचना. | | |
| ५१ | सिनेमा चित्रीकरण परवाना - नवीन परवाना - नूतनीकरण. | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१८०/नवि-२०, दिनांक २९ जानेवारी २०२१. | आदेश क्र. नासुके/०१/कावि-१२७/२०२३, दि. १७ फेब्रुवारी २०२३ अन्वये ७ सेवा अधिसूचित करणेत आलेल्या आहेत. |
| ५२ | व्यवसाय परवाना स्वयंनूतनीकरण (ॲटो रिन्युअल). | | |
| ५३ | जाहिरात परवाना / आकाशचिन्ह परवाना - नवीन परवाना व नूतनीकरण. | | |
| ५४ | रस्ता खोदाई परवानगी देणे - नवीन परवाना - नूतनीकरण. | शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२, दिनांक १५ डिसेंबर २०२२. | |
| ५५ | राज्याच्या खाद्य परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | | |
| ५६ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक संस्थेचे आरोग्यविषयक ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | | |
| ५७ | पाणी उपसा करणेसाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे. | | |

**राजेश आगळे,**

‘ई’ क्षेत्रीय कार्यालय,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

पिंपरी-चिंचवड, १६ जानेवारी २०२५.